मा. न्यायालय प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड     **P.S.(ठाणे):** भाग्य नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0273     **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/06/2024 14:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)इ |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(ब) |
| 4 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 5 | भारतीय दंड संहिता १८६० | १०९ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 01/07/2001
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/09/2019
   **Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/06/2024     **Time (वेळ):** 13:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/06/2024 14:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी     **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सह्याद्री नगर, नांदेड,अर्धापुर, पुसद, हदगांव,सातोना ता परतुर,मुदखेड, जि नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संदिप बाबुराव थडवे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाप्रवि ,नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाप्रवि ,नांदेड,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9765391131

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री नारायण यशवंत राऊत | | | 1. सह्याद्री नगर, नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत | | | 1. सह्याद्री नगर, नांदेड ,भाग्य नगर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्रं.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

पो.स्टे. भाग्यनगर गु.र.न. 273/2024 कलम 13(1)(इ),13(2) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, सुधारीत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन2018चे कलम 13(1)(ब),13(2),12,सह कलम 109 भारतीय दंड विधान प्रमाणे.

1)फिर्यादीः-संदिप बाबुराव थडवे,वय 42 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.नांदेड, मो.नं. 9765391131.

2)आरोपीचे नांव व पत्ता- 1)श्री नारायण यशवंत राऊत, वय 62 वर्षे, सध्या सेवानिवृत्त, उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्रमांक 19, मुदखेड, जि.नांदेड वर्ग-1, 2) सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत, वय 54 वर्षे, व्यवसाय गृहणी,दोघे रा.सह्याद्री नगर, नांदेड

3.गुन्हा घडला तारीख वेळ, ठिकाण -दिनांक 01.07.2001 ते दिनांक 05.09.2019 चे दरम्यान मौजे सह्याद्री नगर, नांदेड, अर्धापुर जि. नांदेड, पुसद, जि. यवतमाळ, हदगांव जि. नांदेड , सातोना ता.परतुर जि. जालना,मुदखेड, जि. नांदेड. पुर्वेस 01कि.मी.

4.अपसंपदा रक्कम-61,23,779/- रूपये.

5)गुन्हा दाखल करणार-पोहेकॉ/748 एल.आर.कनाके, पो.स्टे.भाग्यनगर, नांदेड

6) तपास अधिकारी- गजानन बोडके,पोलीस निरीक्षक, लाप्रवि, नांदेड.

7)खुलासा:-सादर विनंती की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी उपरोक्त कॉलम नं. 02 मधील आरोपी क्र. 1 यांचे मालमत्तेची उघड चौकशी क्र.उचौ/108/ नांदेड /2019 मध्ये त्यांनी परिक्षण कालावधित दिनांक 01.07.2001 ते दिनांक 05.09.2019या त्यांच्या पदीय कालावधीत त्यांचे ज्ञात कायदेशिर उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा 61,23,779/- रुपये म्हणजेच त्यांच्या उत्पनाच्या 40.43% एवढी अपसंपदा संपादित केल्याचे निष्पन्न झाले व आरोपी क्र.2 यांनी सदरची अपसंपदा स्वत:चे नावे संपादीत करुन आरोपी क्र. 01 यांना गुन्हा करण्यास मदत करुन प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. वगैरे बाबत आरोपीतांविरूध्द कलम 13(1)(इ), 13(2) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, सुधारीत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन2018चे कलम 13(1)(ब),13(2),12, सह कलम 109 भारतीय दंड विधान प्रमाणे दिले फिर्यादीवरुन मा.पो.नि. साहेब यांचे आदेशाने गुन्हा दाखल करुन पुढील.तपास श्री गजानन बोडके,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नांदेड यांचेकडे दिला. सरकार तर्फे फिर्याद दि. 27/06/2024

मी संदिप बाबुराव थडवे,वय 42 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.नांदेड, मो.नं. 9765391131.

समक्ष सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी जुलै 2023 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, नांदेड येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 31.08.2019 रोजी तक्रारदार श्री.रविंद्र विठ्ठलराव मुपडे, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी, प्राध्यापक, राजर्षी शाहु उच्च माध्यामिक विद्यालय, आखाडा बाळापुर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली, ह.मु. योगेश्वरी कॉम्प्लेक्स फ्लॅट नं.4, आनंदनगर, नांदेड, मुळ रा. जारीकोट, ता.धर्माबाद, जि.नांदेड यांनी ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे समक्ष हजर होऊन दिलेल्या लाचमागणीच्या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.भुजंग गोडबोले, ला.प्र.वि. नांदेड यांनी दिनांक 05.09.2019 रोजी केलेल्या सापळा कार्यवाहीमध्ये लोकसेवक श्री.नारायण यशवंत राऊत, वय 57 वर्षे, उपविभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प, उपविभाग क्रमांक 19 मुदखेड यांनी तक्रारदार व त्यांचा भाऊ व भावाची पत्नी यांची उर्ध्व पैनगांगा उजव्या कालव्यासाठी भुसंपादीत केलेल्या जमिनिची रजिस्ट्री शासनाचे नावे करून त्याचा मोबादल्याचा चेक देण्यासाठी तक्रारदार श्री.रविंद्र मुपडे यांचेकडे 50,000/- रू.लाचेची मागणी करुन लाच स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने पो.स्टे.धर्माबाद, जि.नांदेड येथे गु.र.नं. 172/2019 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) अन्वये श्री नारायण यशवंत राऊत



Scanned with CamScanner

यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्री.नारायण यशवंत राऊत हे वर्ग-1, दर्जाचे लोकसेवक असल्याने तसेच त्यांचे घरझडतीमध्ये घराचे किंमतीसह 21,00,550/- रू. च्या वस्तु/मालमत्ता मिळुन आल्याने व मौजे सांगवी, नांदेड येथे गट नं. 138 मध्ये दोन मोकळे भुखंड, जय मल्हार चौक, तरोडा बु., नांदेड येथील गट नं. 163 मध्ये चार मोकळे भुखंड हे त्यांचे व त्यांचे पत्नीचे नावे संयुक्तपणे मिळुन आले. एकंदरीत सदरची मालमत्ता त्यांचे सेवा कालावधीत त्यांनी उत्पनाचे ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्तीची संपादित केली असण्याची दाट शक्यता असल्याने, प्रस्तुत प्रकरणात श्री.नारायण यशवंत राऊत यांची उघड चौकशीची करण्याची परवानगी मिळणेसाठी तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.राहुल पखाले, ला.प्र. वि. नांदेड यांनी अहवाल सादर केल्याने मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.लाप्रवि/मुख्या/उ.चौ./नांदेड/2019/8456 दिनांक 22.10.2019 अन्वये उघड चौकशी करण्याची परवानगी प्राप्त झाली. सदर उघड चौकशीचा क्रमांक चौ/उ/108/नांदेड/2019 असा प्राप्त झाला. गैरअर्जदार श्री.नारायण यशवंत राऊत याचे मालमत्तेचे उघड चौकशीचा परिक्षण कालावधी दिनांक 01/07/2001 ते दिनांक 05/09/2019 असा निश्चित करुन तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.राहुल पखाले, ला.प्र.वि. नांदेड यांनी गैरअर्जदार यांचे मालमत्तेची उघड चौकशी केली आहे.

तत्कालीन चौकशी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.राहुल पखाले, ला.प्र.वि. नांदेड यांनी सदर चौकशी दरम्यान गैरअर्जदार श्री.नारायण यशवंत राऊत यांचेकडे व त्यांचे कुटूंबातील ईतर सदस्यांकडे मालमत्ता, उत्पन्न व खर्चाचे अनुषंगाने चौकशी करुन त्यांचा जबाब नोंदवुन त्याचे अनुषंगाने संबंधीत कार्यालयास पत्रव्यवहार करून माहिती प्राप्त केली असता गैरअर्जदार यांचेकडे व त्यांची पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांचे ताब्यात अपसंपदा बाळगल्याचे आढळुन आले. गैरअर्जदार श्री.नारायण यशवंत राऊत यांची दिनांक 15.04.1982 रोजी कनिष्ठ अभियंता या पदावर उर्ध्व पैनगंगा प्रकल्प, उप विभाग क्रमांक 40, अर्धापूर, जि.नांदेड या कार्यालयात शासकीय सेवेत प्रथम नियुक्ती झाली आहे.

गैरअर्जदार श्री.नारायण यशवंत राऊत हे शाखा अभियंता या पदावर गुण नियंत्रण विभाग, नांदेड येथील कर्तव्यावर असताना दिनांक 01.07.2001 ते दिनांक 05.09.2019 पर्यंतच्या परिक्षण कालावधीत त्यांना शासकीय सेवा, बँक कर्ज व वडीलोपार्जीत शेती या ज्ञात उत्पन्नाच्या स्त्रोतामधुन मिळालेले उत्पन्न हे त्यांचेकडे असलेल्या मालमत्ता, खर्च व उत्पन्नाशी विसंगत असल्याचे आढळुन आले. सदरचे उघड चौकशीचे तत्कालीन चौकशी अधिकारी श्री.राहुल पखाले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नांदेड यांनी उघड चौकशी मध्ये गैरअर्जदार व त्यांची पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांनी अपसंपदा धारण केल्याचे निष्पन्न होत असल्याने सदरचा चौकशी अहवाल ला.प्र.वि.नांदेड कार्यालयाचे जा.क्र. 146/2023 दि.02.05.2023 अन्वये मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास चौकशी अहवाल सादर केला होता.

तत्कालीन चौकशी अधिकारी श्री.राहुल पखाले, पो.नि. ला.प्र.वि. नांदेड यांची प्रशासकीय बदली झाल्याने मा. वरिष्ठांचे आदेशावरून दि.13.07.2023 रोजी सदर उघड चौकशी पुढील चौकशीकामी आमचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.

त्यानंतर सदर उघड चौकशीत आम्ही अधिक चौकशी करून पुरावे उपलब्ध केले व ला.प्र.वि.नांदेड कार्यालयाचे जा.क्र.4662/2023 दि.29.12.2023 अन्वये मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास अंतीम चौकशी अहवाल सादर केला होता. सदर प्रकरणी झाले कागदपत्रांचे अवलोकन होऊन मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे जा.क्र.लाप्रवि/मुख्या/चौ. अ/108/नांदेड/2019/6306 दि.20.06.2024 अन्वये गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत व त्यांची पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्याबाबत मान्यता दिली आहे. सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत व त्यांची पत्नी सौ.सुनिता नारायण राऊत यांनी त्यांचे ज्ञात उत्पन्नाच्या तुलनेत 61,23,779/- रू. (40.43%) रूपयांची अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न झाले आहे.

गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत यांचेकडे व त्यांचे कुटूंबीयांकडे उघड चौकशी मध्ये उत्पन्न, खर्च व मालमत्ता यांची तुलनात्मकरित्या गणना केली असता,त्यांनी खालीलप्रमाणे अपसंपदा संपादीत केल्याचे निष्पन्न होत आहे.

अपसंपदेची एकत्रित गणना

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 05.09.2019 रोजी असलेली मालमत्ता (विधान ब) | 54,48,967 |
| 2 | दिनांक 01.07.2001 रोजी असलेली मालमत्ता (विधान अ) | 13,709 |
| 3 | परीक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता (ब -अ) | 54,35,258 |
| 4 | परीक्षण कालावधीतील एकूण खर्च (विधान ड) | 1,58,35,597 |
| 5 | परीक्षण कालावधीतील एकूण मालमत्ता व खर्च (3+4) | 2,12,70,855 |



Scanned with CamScanner

6 परीक्षण कालावधीतील एकूण उत्पन्न (विधान क) 1,51,47,076
7 अपसंपदा (D.A.) = ( 5 - 6 ) 61,23,779
8 अपसंपदा टक्केवारी = D.A. x 100 / Total Income 40. 43 %

एकंदरीत, प्रस्तुत उघड चौकशी प्रकरणात गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत, वय 62 वर्षे, सध्या सेवानिवृत्त, उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्रमांक 19, मुदखेड, जि.नांदेड वर्ग-1 व गैरअर्जदार यांची पत्नी सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत, वय 54 वर्षे, व्यवसाय गृहणी दोघे रा.सह्याद्री नगर, नांदेड यांनी दिनांक 01.07.2001 ते दिनांक 05.09.2019 या दरम्यान गै.अ. यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत व त्यांची पत्नी यांच्या मालमत्तेच्या उघड चौकशीमध्ये त्यांनी संपादीत केलेल्या मालमत्ते बाबत ज्ञात स्त्रोताव्दारे संपादीत केल्याचे पुरावे सादर करण्यासाठी वेळोवेळी संधी देण्यात आली होती. त्याबाबत गैरअर्जदार हे पुष्टीदायक पुरावे सादर करु शकले नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत व त्यांची पत्नी सुनिता भ्र.नारायण राऊत यांचेकडे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतापेक्षा 61,23,779/- रूपये म्हणजेच उत्पन्नाच्या तुलनेत40.43% ईतकी बेहिशोबी अपसंपदा संपादित केली असल्याचे निष्पन्न होते.

गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत व त्याची पत्नी सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत यांनी सहयाद्रीनगर कमान नांदेड येथे गट क्रमांक 234 मध्ये प्लॉट क्रमांक-31(30x50=1500 sq F ) दोन मजली तयार ईमारत, जयमल्हार चौक, मौजे तरोडा (बु), ता.जि.नांदेड मधील गट नं 163 मध्ये प्लॉट नं 5(1575 sq F ), 6,7,8 एकत्रित जागा (3780 sq F), 9(1470 sq F) असे एकुण 5 प्लॉट, मो.सा.क्र. एम.एच. 26 ए.एल 6541, सीबीझेड मो.सा.क्र. एम.एच. 26 डब्ल्यु 5240, एम.एच. 26 व्ही 6541 ही शव्हरलेट तवेरा चारचाकी वाहन खरेदी तसेच Axis Bank, कलामंदीर नांदेड AC/No-944010031473764 या खात्यावर निरीक्षण कालावधी अखेर दिं.04/09/2019 पावेतो 8,22,955/-रू.एवढी शिल्लक तसेच Axis Bank, कलामंदीर नांदेड AC/No 918040081885336 असे RIC Scheme खाते असुन त्यामध्ये दि.30/08/2018 रोजी 8,00,000/-रू.एवढी रक्कम फिक्स डिपॉझिट व Axis Bank, कलामंदीर नांदेड येथे D Mat खाते क्रमांक 29160497 द्वारे Ashok Leyland 100 शेअर, IDFC First Bank Ltd चे 50 शेअर, Tata Power एक शेअर असे एकुण विविध कंपनिचे 10,678/- रूपयाचे शेअर्स अशी बेहिशोबी मालमत्ता (अपसंपदा) त्यांचे ताब्यात बाळगुन संपादित केली आहे.

गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत, वय 62 वर्षे, सध्या सेवानिवृत्त, उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्रमांक 19, मुदखेड, जि.नांदेड वर्ग-1 यांचे मालमत्तेची उघड चौकशी क्र.उचौ/108/ नांदेड /2019 मध्ये त्यांनी परिक्षण कालावधित दिनांक 01.07.2001 ते दिनांक 05.09.2019या त्यांच्या पदीय कालावधीत त्यांचे ज्ञात कायदेशिर उत्पन्नाच्या स्त्रोतापेक्षा 61,23,779/- रुपये म्हणजेच त्यांच्या उत्पनाच्या 40.43% एवढी अपसंपदा संपादित केल्याचे,गैरअर्जदार यांची पत्नी सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत, वय 54 वर्षे, व्यवसाय गृहणी,रा. सह्याद्री नगर, नांदेड यांनी सदरची अपसंपदा स्वत:चे नावे संपादीत करुन गैरअर्जदार यांना गुन्हा करण्यास मदत करुन प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यामुळे गैरअर्जदार श्री नारायण यशवंत राऊत, वय 62 वर्षे, सध्या सेवानिवृत्त, उप विभागीय अधिकारी, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प क्रमांक 19, मुदखेड, जि.नांदेड वर्ग-1 यांनी कलम 13(1)(इ), 13(2) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 व कलम 13(1)(ब), 13(2)भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारीत अधिनियम सन2018) प्रमाणे व गैरअर्जदार यांची पत्नी सौ.सुनिता भ्र.नारायण राऊत, वय 54 वर्षे, व्यवसाय गृहणी, रा. सह्याद्री नगर, नांदेड यांनी कलम 13(1)(इ), 13(2) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 सह कलम 109 भारतीय दंड विधान व कलम 13(1)(ब), 13(2),12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारीत अधिनियम सन2018) प्रमाणे गुन्हा केल्याने माझी त्यांचे विरूध्द सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

समक्ष फिर्याद दिली सही.



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

RAMDASH BABURAO SHEDGE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो. स्टे. भाग्यनगर, नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name** (नाव): RAMDASH BABURAC
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner